## ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी सूचना

# Vaikunth Mehta National Institute of Cooperative Management Pune-2021

# प्रशिक्षणार्थी लेखनिक व वरिष्ठ लेखनिक परीक्षा -२०२१

खाली दिलेल्या सर्व सूचना व अहर्ता काळजीपूर्वक वाचा आणि प्रत्यक्ष अर्ज करण्यापूर्वी प्रशिक्षणार्थी लेखनिक व वरिष्ठ लेखनिक पदाविषयीची अहर्ता (माहितीचे) वाचन करून त्यातील अटी व शर्ती पडताळून पाहाव्यात आणि प्रशिक्षणार्थी लेखनिक व वरिष्ठ लेखनिक पदासाठी असलेली अहर्ता पात्र उमदेवार अर्ज भरू शकतात.

उमेदवाराने अर्ज भरण्यापूर्वी इ. १० वीची मार्कशीट(साईज **10 MB** पेक्षा कमी ) , पदवीची मार्कशीट (**10 MB** पेक्षा कमी असावी ), जातीचे प्रमाणपत्र (असल्यास व साईज **10 MB** पेक्षा कमी असावी ) , गॅजेट प्रमाणपत्र (असल्यास व साईज **10 MB** पेक्षा कमी असावी ) , IT प्रमाणपत्र (एका पेक्ष्या जास्त IT प्रमाणपत्रे असतील तर ती एकाच पीडीएफमध्ये एकत्र करून अपलोड करावी व साईज **20 MB** पेक्षा कमी असावी) , हे सर्व दस्तावेज **.PDf** फॉरमॅट मध्ये आपल्या कॉम्पुटरमध्ये किंवा पेनड्राईव्हमध्ये तयार असावेत. तसेच फोटो आणि स्वाक्षरी (साईज **10** ते **100 KB** ) **.jpg** फॉरमॅट तयार असावी.

**१. प्रशिक्षणार्थी लेखनिक:**

१. फक्त महिला उमेदवार अर्ज भरु शकतात.

२. संगणकाचे ज्ञान असणे अनिवार्य.

३. तुम्ही दहावी परीक्षेत किमान ६० % किंवा पदवीधर परीक्षेत किमान ५० % गुण असणे अनिवार्य.

५. वयोमर्यादा: (जाहिरातीचा दिवस दि. **२४ मार्च २०२१** या तारखे पर्यंत तुमचे वय ग्राह्य धरले जाईल.)

| **प्रवर्ग** | **वयोमर्यादा** |
|---|---|
| खुला | २१ – ३३ वर्षे |
| इतर वर्ग | २१ – ३५ वर्षे |

**२. वरिष्ठ लेखनिक :**

१. आपण बी.सी.ए / बी.एस.सी (कॉम्पुटर सायन्स) / बी.सी.एस. पदवी उत्तीर्ण असणे अनिवार्य.

२. आपल्याकडे एकूण ९ वर्षांचा कामाचा अनुभव व किमान २ वर्षांचा अर्बन सहकारी बँकेतील आयटी विभागात काम केल्याचा अनुभव असणे अनिवार्य.

३. Do you have Computer knowledge & Skills of(Server Installation and Troubleshooting, Experience in Handling and maintaining Data Center requirements, e.FAS, PAC, Monitoring etc., knowledge of VMware and Hyper V, knowledge of Linux OS, Desktop/Laptop Hardware and OS level support, Certifications – MCP/MCITP/A+)?

४. वयोमर्यादा: (जाहिरातीचा दिवस दि. **२४ मार्च २०२१** या तारखे पर्यंत तुमचे वय ग्राह्य धरले जाईल.)

| **प्रवर्ग** | **वयोमर्यादा** |
|---|---|
| खुला | कमाल ३३ वर्षे |
| इतर वर्ग | कमाल ३५ वर्षे |

खाली नमूद केल्याप्रमाणे प्रशिक्षणार्थी लेखनिक व वरिष्ठ लेखनिक परीक्षेची नोंदणी व अर्ज भरण्यासाठी पुढील सर्व महत्वाचे टप्पे आहेत. **(ऑनलाईन नोंदणी / अर्ज भरताना व इतर सर्व ऑनलाईन प्रक्रिया राबवताना “Google Chrome” ब्रॉउजरचा वापर करावा.)**

**१. उमेदवाराची ऑनलाईन नोंदणी.**
**२. ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे.**
**३. ऑनलाईन अर्ज भरणे.**
**४. प्रमाणपत्रे अपलोड करणे.**
**५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे.**
**६. भरलेल्या अर्जाची PDF डाउनलोड करणे.**

१. **उमेदवाराची ऑनलाईन/ नोंदणी :**

उमेदवाराने सर्वप्रथम https://vamnicomonline.com या संकेतस्थळावर भेट दिल्यास त्यांना होम पेज डाव्या बाजूस असलेल्या Apply online Here (ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी सूचना वाचल्या आहेत.) हि लिंक दिसेल, उमेदवाराने या लिंकला क्लिक केल्यास त्यांना रेजिस्ट्रेशन पेज दिसेल, त्या पेजला तुम्हाला दाखवल्या गेलेल्या पदनिवडा ड्रॉपडाउनमध्ये असलेल्या प्रशिक्षणार्थी लेखनिक व वरिष्ठ लेखनिक या पैकी एका पदाची निवड करावी. त्यानंतर आपणास प्रशिक्षणार्थी लेखनिक व वरिष्ठ लेखनिक पदासंदर्भातील प्रश्न दिसतील, ते प्रश्न खालीलप्रमाणे आहेत,

- या सर्व **प्रशिक्षणार्थी लेखनिक** पदासाठी आवश्यक अर्हता आहेत.

१. तुम्ही महिला आहात का ?

२. तुम्हाला संगणकाचे ज्ञान आहे का ?

३. तुम्ही पदवीधर आहात का ?

४. आपण दहावीमध्ये किमान ६० % किंवा पदवीमध्ये किमान ५० % मिळवले आहेत?

- या सर्व **वरिष्ठ लेखनिक** पदासाठी आवश्यक अर्हता आहेत.

१. आपण बी.सी.ए / बी.एस.सी (कॉम्पुटर सायन्स) / बी. सी. एस. पदवी उत्तीर्ण केली आहे का?

२. आपल्याकडे एकूण ९ वर्षांचा कामाचा अनुभव व किमान २ वर्षांचा अर्बन सहकारी बँकेतील आयटी विभागात काम केल्याचा चा अनुभव आहे का ?

३. Do you have Computer knowledge & Skills of(Server Installation and Troubleshooting, Experience in Handling and maintaining Data Center requirements, e.FAS, PAC, Monitoring etc., knowledge of VMware and Hyper V, knowledge of Linux OS, Desktop/Laptop Hardware and OS level support, Certifications – MCP/MCITP/A+)? :

तुम्ही वरील सर्व पात्रतांमधें बसत असाल तरच आपण रेजिस्ट्रेशन करू शकता आणि तुम्हाला वरील विचारल्या गेलेल्या प्रश्नांची उत्तरे YES रेडिओ बटन किंवा NO रेडिओ बटन क्लिक करून द्यायची आहेत ,त्यानंतर तुम्हाला तुमचे अचूक वय व जात निवडावे आणि Save & Procced बटनाला क्लिक करावे, त्या नंतर ऑनलाईन रेजिस्ट्रेशन पेज उघडेल, ऑनलाईन रेजिस्ट्रेशन या फॉर्म वरील सर्व माहिती अचूक भरावी व हि सर्व माहिती भरणे अनिवार्य आहे आणि सर्व माहिती इंग्रजी भाषेत भरावी.

**२. ओटीपी पडताळणी आणि अँप्लिकेशन नंबर & पासवर्ड मिळवणे :**

त्या नंतर तुम्हाला नोंदविलेल्या भ्रमणध्वनीला SMS द्वारे OTP येईल, मिळालेला OTP तुम्ही Enter OTP Here येथे प्रविष्ट करावा.तुम्ही प्रविष्ट केलेल्या OTP ची पडताळीनी झाल्यावर, तुम्हाला तुमचा Application No आणि Password नोंदविलेल्या भ्रमणध्वनीला SMS द्वारे येईल . तुम्हाला प्राप्त झालेला Application No व Password पुढील कार्यवाहीसाठी जतन करून ठेवावा आणि Application No व Password सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी तुमची राहील.

**३.उमेदवाराने ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे :**

त्यांनतर तुम्हाला लॉगिन स्क्रीन दर्शविली जाईल त्या लॉगिन स्क्रीनला मिळालेला Application No व Password प्रविष्ट करावा आणि login या बटनावरती क्लिक करावे, त्या नंतर PAYMENT INSTRCUTION पेज उघडले जाईल. ह्या पेज वरील सुचना काळजी पूर्वक वाचून समोरील चेक बॉक्स ला टिक करावे आणि Proceed बटनाला क्लिक करावे व ऑनलाइन पध्दतीने उमेदवाराने शुल्क भरणासाठी क्रेडिट कार्ड ,डेबिट कार्ड ,नेट बँकिंग, wallet / कॅश कार्ड असे पर्याय उपलब्ध होतील आपणास सोयीस्कर असलेल्या पर्याय निवडून शुल्क भरावे. ऑनलाईन शुल्क भरते वेळी वीज जाणे ,इंटरनेट जाणे किंवा दुसऱ्या कोणत्याही तांत्रिक कारणांनी जर शुल्क जमा न झाल्यास पुन्हा लॉगिन करून शुल्क व ऑनलाईन भरावे.

खाली परीक्षा फी व त्या सोबतचे टॅक्स भरवायची माहिती आहे कृपया त्या नुसार आपण आपली परीक्षा फी ऑनलाईन भरावी.

PAYMENT INSTRUCTION:

- Before completing Application, form Applicant must make online payment as given Below;

परीक्षा शुल्क:

| Sr. No | प्रवर्ग | परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | खुला | 1000 + बँक चार्जेस |
| २ | इतर वर्ग | 1000 + बँक चार्जेस |

- Nominal charges/convenience fee along with service taxes are levied by respective banks/payment gateway.

परीक्षा शुल्क आणि बँक चार्जेस तपशील:

| Sr. No. | Payment Mode | Bank Charges |
|---|---|---|
| 1 | Visa, MasterCard, RuPay Credit Cards | 1.0% of transaction value |
| 2 | American Express, Diners Credit Cards | 2.0% of transaction value |
| 3 | Visa, MasterCard, Debit + ATM Pin Debit Cards | 0.90% of transaction value |
| 4 | RuPay Debit Cards | Nil |
| 5 | Internet Banking | Rs. 17 per transaction for Axis Bank, HDFC |

| | | |
|---|---|---|
| | | Bank ICICI Bank, Kotak Bank and SBI Rs. 12 per transaction for all other Banks |
| 6 | Telco, Private Wallets & Other Prepaid Cards | 1.85% of transaction value |
| 7 | UPI based payments | Nil |
| 8 | Bharat QR | Credit/Debit Card charges as per the instrument linked |

- Do not attempt a fee transaction second time if you have already attempted once. In such cases ensure that amount is not debited to your bank account.
- Please do not refresh the page or click Back/Refresh button while processing your payment.
- You may call our helpline number for any query/clarification.

**४.उमेदवाराने ऑनलाईन माहिती भरणे:**

Personal Information हा Screen दिसेल. सदर Screen वरील रिक्त जागी आपली उर्वरीत माहिती भरुन Submit and Proceed या बटनवर Click करा.

**५.उमेदवाराने ऑनलाईन शैक्षणिक माहिती भरणे:**

त्यानंतर आपणास Education Details हा Screen दिसेल. सदर Screen वरील माहिती भरुन Add या बटनवर Click करा. आपण भरलेली माहिती त्याखाली Add होईल. सदरची भरलेली माहिती योग्य असलेची खात्री करुन Proceed या बटनवर Click करा.

**६.उमेदवाराने प्रमाणपत्रे ऑनलाइन अपलोड करणे:**

त्यानंतर आपणास Upload Document हा Screen दिसेल. ह्या स्क्रीनला आपल्याला इ. १० वीची मार्कशीटची आणि पदवीची मार्कशीटची प्रत अपलोड करणे , तसेच जर आपण SC /ST /OBC (इ. मागास वर्गीय ) पर्याय निवडलेला असेल तर आपणास जातीचे प्रमाणपत्र जोडणे राहील आणि तुमच्या नावामध्ये काही बदल असल्यास आपण गॅजेट प्रमाणपत्र अपलोड करावे, ।T प्रमाणपत्र(एका पेक्ष्या ।T जास्त प्रमाणपत्रे असतील तर ती एकाच पीडीएफमध्ये एकत्र करून अपलोड करावी व साईज 20 MB पेक्षा कमी असावी) हे सर्व दस्तवेज .PDf फॉरमॅट मध्ये अपलोड करून झाल्यास तुम्ही कागदपत्रे पाहू शकता ,जर चुकीचे प्रमाणपत्र अपलोड झाली असतील तर तुम्ही पुन्हा अपलोड करू शकता

**७.उमेदवाराने ऑनलाइन कामाचा अनुभवाविषयीची माहिती भरणे:**

त्यानंतर आपणास Employment Details हा Screen दिसेल. सदर Screen वरील माहिती भरुन Add या बटनवर Click करा. आपण भरलेली माहिती त्याखाली Add होईल. सदरची भरलेली माहिती योग्य असलेची खात्री करुन Proceed या बटनवर Click करा. (जर तुम्हाला कामाचा अनुभव असेल तरच प्रविष्ट करावा.)

**८.उमेदवाराने छायाचित्र आणि स्वाक्षरी ऑनलाईन अपलोड करावी:**

त्यानंतर आपणास Upload Photo & Signature हा Screen दिसेल. सदर Screen वर खाली दिलेल्या सूचना प्रमाणे आपला फोटो व सही अपलोड करा. (छायाचित्र आणि स्वाक्षरी JPG Format मध्ये असावी 10 kb पेक्षा कमी नसावी 100 kb पेक्षा जास्त नसावी.)

**९. भरलेल्या अर्जाची PDF डाउनलोड करणे :**

उमेदवाराने त्यानंतर आपण भरलेल्या माहितीची खात्री करून **PDF** डाउनलोड करावी एकदा **PDF** डाउनलोड केल्यानंतर आपण भरलेल्या माहिती मध्ये काहीही दुरुस्ती करू शकत नाही अर्जाची प्रत भावी संदर्भासाठी आपल्याकडे जतन करून ठेवावी.

**(NOTE: उमेदवाराने वरील दिलेल्या प्रमाणे आकारलीं गेलेली परीक्षा शुल्क ऑनलाइन भरावी .)**

(अर्जाच्या बाबतीत अडचणी असल्यास दुरध्वनी क्रमांक 9637374919 व वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन, गणेशखिंड रोड, पुणे 411 007 येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते 5.45 पर्यंत संपर्क साधावा अथवा rvamnicom@gmail.com या ई-मेलवर आपले म्हणणे कळवावे. )